# परिवर्तन (बोधकथा)

रत्ना-एक डाकू, जंगलातील रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना लुटणे, हा त्यांचा धंदा होता. आपल्या आई-वडिलांचे, पत्नी आणि मुलाचे पालन पोषण करण्य़ासाठी तो हा आसूरी धंदा करीत होता.

असाच एकदा झडावर बसून तो येणाऱ्या जाणाऱ्यांना पाहात असताना त्याला चार पाच जण येताना दिसले. हा लगेच सावध झाला, झाडावरुन उडी मारली आणि त्यांच्या समोर उभा राहिला. आणि गर्जना करीत म्हणाला तुमच्या जवळच धन माझ्या हवाली करा, नाहीतर बे मौत मराल. त्या चौघांपैकी काही बावरले, घाबरले पण त्यातील एक तेज पुंज व्यक्ती मात्र शांती होती. त्यांच्या ओठाच्या कोपऱ्यात हसू फुटलं होतं.

हे काय? रत्ना क्षणभर विचारात पडले आणि गर्जला मी काय म्हणतो ते समजत नाही का? काय असेल ते धन काढा लवकर.......

ती शांती व्यक्ती  हळूहळू चालत रत्नाकडे येत होती. निर्भयता त्याच्या प्रत्येक पावलात दिसून येत रत्ना मात्र स्तब्ध झाला होता. त्याने जवळ येऊन रत्नाच्या खांद्यावर हात ठेवला आणि म्हणाला तुला आम्हाला लुटायचे आहे. ना? भले घे आमच्या जवळ काय आहे ते .. तुला आम्हाला मारायचे आहे काय? खुशाल मार पण एक सांग हे पापकर्म तु कशासाठी करतोस? भल्या भल्यांनी घाबरविणारा रत्ना आज पाहात होता फक्त. परत त्यांच्या कानावर शब्द आले.. कशासाठी?  करतोस हे ? माझ्या आई-वडिलांचे, पत्नीचे आणि मुला बाळांचे भरण पोषण करण्यासाठी.... रत्ना उत्तरला कुटुंबासाठी? तु जर हे पापकर्म कुटुंबासाठी करतो आहेत तर हे सर्व तुझ्या या पाप कर्मात सहभागी आहेत? नक्कीच नाही... हवं तर तु त्यांना विचारुन ये. ते सर्वजण माझ्या या कर्मात सहभागी आहेत, तुम्ही कसे काय समजता की मी एकटाच पापी आहे. रत्ना पुटपुटला.

तुला माझ्या म्हणण्यावर विश्वास बसत नाही ना? तु त्यांना विचारुन ये, आम्ही कुठेही पळून जात नाहीत. हवं तर आम्हाला बांधून ठेव. रत्नानी तसचं केल आणि घरी जाऊन आपल्या पत्नीला विचारलं मी तुझ्यासाठी चोरी करतो, लुटालुट करतो, कधी कुणाला जीवे मारतो ही, या माझ्या पाप कर्मात तुझाही वाटा आहे, हो ना? माझ्या? तुम्ही मला लग्न करुन घेऊन आला, माझ्या खाण्यापिण्यांची, वस्त्र, आभूषणांची व्यवस्था करण्याचे कर्तव्य तुमचे मग तुम्ही पुण्य कर्म करुन करा कि चोऱ्या माऱ्या करुन माझा काय संबंध, मी काय म्हणून पापात वाटेकरी होणार? रत्नाने आपल्या आई-वडिलांनाही हाच प्रश्न केला तेव्हा त्याला उत्तर मिळाले , आमची सेवा करणे हे तुझे काम आहे, तु ते कसंही कर, आम्ही तुझ्या पापकर्मातील वाटेकरी नाही. मुलांनी ही हेच उत्तर दिले आणि रत्नाच्या पायाखालची जमीन सरकली, डोक्यात लख्ख प्रकाश पडला, तो तसाच धावत पळत जंगलात त्या व्यक्तीकडे गेला, त्यांना बंधन मुक्त केले आणि त्यांच्या पायावर पडला. विलाप करत म्हणू लागला हे सतपरुषा तुझीचं गोष्ट खरी आहे. माझे डोळे उघडतेल आता मी काय करु? पापमुक्त कसा होऊ? महात्मा गांधीनी त्याचे डोळे पुसले आणि म्हणाले नेहमी एका ईश्वराच्या आठवणीत रहा आणि सद्मार्गावर चालून कुटुंबांचे पालन पोषण कर निः स्वार्थ सेवा कर... या घटनेने रत्नाचे जीवनच बदलून गेले. वाचक हो! हा रत्नाच पुढे कालजयी महर्षी वाल्मीकी म्हणून प्रसिद्ध झाला. त्यांनी लिहिलेले वाल्मिकी रामायण हे महाकाव्य अनेकांना आजही प्रेरणा देत आहे.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com